# शेतकरी संघटक

पाक्षिक

वार्षिक वर्गणी रु. २५

किंमत १ रुपया

वर्ष ९ वे | २१ एप्रिल १९९२ | अंक २ रा


# जोतिबांच्या 'भटशाही' विरोधाचा खरा अर्थ

**– शरद जोशी**

महात्मा ज्योतिबा फुल्यांविषयी जे काही मला म्हणायचे आहे ते मी माझ्या 'शेतकऱ्याचा असूड : शतकाचा मुजरा' या पुस्तिकेत थोडक्यात मांडलं आहे. १९८३ साली म. फुल्यांचं 'शेतकऱ्याचा असूड' हे पुस्तक लिहून शंभर वर्षे पूर्ण झाली. १८७३ साली कार्ल मार्क्स्‌ने 'दास कॅपिटल' हा ग्रंथ लिहिला तर फुल्यांनी 'शेतकऱ्याचा असूड' १८८३ साली लिहिला. शंभर वर्षानंतर या पुस्तकाचे मूल्यमापन करून त्याला त्रिवार मुजरा करण्याकरिता लिहिलेले पुस्तक म्हणजे '...शतकाचा मुजरा.'

यंदाचे वर्ष हे महात्मा फुले यांच्या स्मृतिशताब्दीचे वर्ष आहे. त्यामुळे वर्षभर ज्यांनी कधी जोतिबांचं एकही पुस्तक उलगडून वाचलेलं नाही अशी मंडळीसुद्धा त्यांच्याबद्दल लांब लांब व्याख्यानं देणार आहेत. जोतिबा हे शिष्यांच्या दृष्टीने फार दुर्भागी होते. प्रत्यक्ष काम करीत असतांना कामाचा प्रसार तसा फार थोडा झाला. त्यांना जे शिष्य मिळाले त्यांनी जोतिबांचं तत्त्वज्ञान फारसं समजून घेतलं नाही, फक्त त्यांच्या विचारातला सहज पटणारा, समजणारा भाग म्हणजे भटशाहीच्या विरोधाचा, तेवढाच जोतिबांच्या शिष्यांनी उचलला. या भटशाहीच्या विरोधाचासुद्धा जोतिबांच्या मनामध्ये जो अर्थ होता तो लक्षात न घेता सोयीस्कर तेवढाच अर्थ लावून त्यांचे सगळे शिष्य पुढे गेले.

मी काही व्यक्तिपूजक नाही. त्यामुळे कोणाही थोर पुरुषाच्या बाबतीत बोलतांना

**(म. जोतिबा फुले स्मृति शताब्दीनिमित्त मनमाड येथे दि. १० डिसेंबर १९८९ रोजी मनमाड नगर परिषद व मास मुव्हमेंट यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात शरद जोशी यांनी केलेले भाषण.)**

## जोतिबा हिंदुत्ववादी होते?

महात्मा जोतिबा फुले यांची स्मृतीशताब्दी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जन्मशताब्दी गेल्या वर्षीच संपूर्ण देशभर, विशेषतः महाराष्ट्रात साजरी करण्यात आली. थोर नेत्यांच्या जयंत्या व मयंत्या साजऱ्या करणे हा आपल्याकडे निव्वळ उत्सवाचा प्रकार झाला आहे. त्यांनी समजाला दिलेल्या विचारधनाकडे लक्ष द्यायला कुणाला फुरसत नसते; तसे करणे बऱ्याच जणांना गैरसोयीचेही ठरत असावे.

चार वर्षापूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'रिडल्स इन् हिंदुइझम' या पुस्तकाच्या निमित्ताने महाराष्ट्रात गदारोळ माजविणारांच्या कुटुंबातील रा. स्व. संघाचे सरसंघचालक श्री. बाळासाहेब देवरस पुण्याला आयोजित एका 'आंबेडकर जयंती समारोहात' म्हणाले की, "महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकर यांनी मुस्लिम नव्हे तर हिंदु समाजावर टीका केली. ख्रिस्ती किंवा मुस्लिम धर्म स्वीकारणारे राष्ट्रीय जीवनापासून दूर होतील असे डॉ. आंबेडकरांचे मत होते म्हणून त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला. हिंदु धर्मात सुधारणा करण्याचा त्यांनी प्रयत्न केल्याने त्यांचा उल्लेख हिंदुत्ववादी असा करण्यात काहींच गैर नाही." बाबासाहेबांनी हिंदु धर्मात सुधारणा करण्याचे जे काही प्रयत्न केले असे सरसंघचालक कबूल करतात त्या मार्गांनी हिंदु धर्मात सुधारणा करण्याचा प्रयत्न रा. स्व. संघाने कसा कसा केला हे त्यांनी सांगितले असते तर बरे नसते का झाले?

इकडे दोनच दिवसांनी, त्याच पुण्यात दुसऱ्या एका संस्थेने आयोजित केलेल्या 'जयंती उत्सवांत' श्री. बाबा आढाव गरजले, "फुले-आंबेडकरांना हिंदुत्ववादी ही उपाधी लावू पाहाणारे फुले-आंबेडकरांची बदनामी करीत आहेत."

आता काही दिवस या विषयावर खमंग चर्चाही चालू राहील, कदाचित्. पण त्यात या महामानवांनी जो विचार मांडला त्याचा त्यात लवलेशही असणार नाही. वर्षभरापूर्वी जेव्हा 'म. फुले स्मृती व डॉ. आंबेडकर जन्मशताब्दी' सुरू झाली तेव्हा शेतकरी संघटनेचे नेते श्री. शरद जोशींनी महात्मा फुल्यांचे भक्त आणि वारसदार म्हणविणाऱ्यांसमोर म. फुले काय म्हणत होते हे ठेवले आणि उघड प्रश्न केला होता की हे स्वीकारण्याचे धाष्टर्य तुमच्यात आहे का? प्रश्न अनुत्तरीतच आहे. राजकीय सोयीसाठी थोर नेत्यांची नावे वापरण्याच्या ढोंगीपणाला आव्हान देणारा हा लेख शेतकरी संघटकच्या वाचकांसाठी पुनर्मुद्रित करीत आहे.

– संपादक

जी काही शब्दांची आतषबाजी केली जाते ती करण्याची माझी मुळीच इच्छा नाही. जोतिबा फुले महामानव होते हे मीही मानतो; पण ते मानव होते, परमेश्वर नव्हते. आणि मानवाच्या हातून जशा चुका होतात तशा त्यांच्याही हातून झाल्यात. भालेकर आणि दीनबंधु वगैरे प्रकरणाच्या उहापोह मी आता करीत नाही, पण अगदी लिखाणा-मध्येसुद्धा जोतिबांनी जे व्युत्पत्तिशास्त्र वापरलं आणि व्युत्पत्तीची ज्या तऱ्हेची उदाहरणं दिली ती दिली नसती तर जास्त चांगलं झालं असतं, त्यांच्या लिखाणाचा बोझ थोडा वाढला असता असं मानणाऱ्यांपैकी मी आहे. या व्युत्पत्तींनी त्यांच्या मांडणीमध्ये काही मोठा फरक पडला असे नाही. उदाहरणार्थ, खंडोबाविषयी बोलतांना मल्ल, आरी त्यावरून मल्हारी आणि पुढे मियाँ मल्हार नावाचा राग अशा तऱ्हेची जी काही मांडणी केली होती ती अगदी अनावश्यक होती, पण त्यांनी ती केली. हिंदुंच्या ग्रंथांवर हल्ला करणारे लिखाण करतांना काही किमान पुरावा समोर ठेवायला पाहिजे तेवढासुद्धा ठेवण्याची त्यांनी काही कोशिस केली नाही. अर्थात्, हिंदुंच्या ज्या ग्रंथांवर जोतिबा फुल्यांनी हल्ला केला त्या ग्रंथाना तरी असं कोणतं प्रामाण्य होतं? चार तोंडाचा ब्रह्मदेव, त्याला पायातनं काही पोरं होणार, बेंबीतनं काही पोरं होणार, नाकातनं काही पोरं होणार आणि तोंडातनं काही पोरं होणार असल्या गोष्टी सांगणाऱ्या 'खल्लड' ग्रंथांना उत्तर देण्याकरिता मोठ्या साक्षीपुराव्यांची तशी गरज तरी काय आहे? पण टीका करणारांना तेवढाच मुद्दा सापडला.

आता यंदा स्मृतिशताब्दीनिमित्त फुल्यांवरील भाषणांचं पेव फुटणार आहे. दुर्दैवाची गोष्ट अशी की ज्यावेळी स्मृतिशताब्दीचे साल सुरू होत आहे त्याच वेळी जोतिबा फुल्यांचा सपशेल पराभव व्हावा असे ढग फुल्यांच्या महाराष्ट्रावर दिसायला लागले आहेत. ज्या एका तत्त्वाची मांडणी जोतिबा फुल्यांनी केली ते तत्त्व भिरकाटून लावणारी मंडळी आणि राजसत्ता हाती घेऊ इच्छिणारी मंडळी महाराष्ट्रामध्ये आता विजयोन्मादाने फिरत आहेत, एक किल्ला जिंकला आता पुढचा किल्ला काय? विधानसभेच्या किल्ल्यावर आता आमचाच झेंडा लागतो की नाही ते पाहा, असं उघड आव्हान देत ही मंडळी फिरताहेत.

आज मी जोतिबा फुल्यांच्या विचाराच्या एकाच भागाची मांडणी तुमच्यासमोर करणार आहे, जी आजपर्यंत फारशी गांभिर्याने झालेली नाही. महाराष्ट्राच्या इतिहासाची आपली माहिती आपण शाळेमध्ये जो इतिहास शिकतो त्यावरच आधारलेली असते. फार थोडी माणसं शाळेतला इतिहासाचा पेपर लिहून झाल्यानंतर इतिहासाची वेगळी पुस्तकं वाचून, अभ्यासानं काही स्वतंत्र मत बनवतात.

महाराष्ट्रामध्ये जी मुलं शिकतात त्या सगळ्यांची कल्पना अशी की महाराष्ट्राचा इतिहास अत्यंत उज्ज्वल इतिहास आणि या उज्ज्वल इतिहासाची सुरूवात होते शिवाजीपासून. त्याच्या आधीचा मुसलमानी अंमल म्हणजे अत्यंत दुष्ट कृत्यांचा, गायींच्या कत्तलींचा, ब्राह्मणांच्या शेंड्या कापल्या जाण्याचा. या अत्यंत वाईट काळात शिवाजीने हिंदुपदपादशाही स्थापन करून महाराष्ट्राला वाचविले आणि तेथून महाराष्ट्राच्या दैदीप्यमान इतिहासाला सुरुवात झाली. तेराव्या शतकाच्या शेवटी अल्लाउद्दिनाने देवगिरीवर हल्ला केला तेव्हापासून महाराष्ट्राचा इतिहास म्हणजे एका बाजूला हिंदू आणि दुसऱ्या बाजूला मुसलमान अशा लढाया; मुसलमानांनी आक्रमणं केली आणि हिंदु राजांना आणि त्यांच्या राजघराण्यांना बरबाद केलं; देवगिरीच्या रामदेवरायाचा सगळा वंश संपवून टाकला आणि त्यांची गुलामगिरी संपूर्ण महाराष्ट्रावर लादली; त्यातून शिवाजीने महाराष्ट्राची सुटका केली; असा एकूण सगळा महाराष्ट्राचा इतिहास म्हणजे मुसलमान विरूद्ध हिंदू अशा एका प्रचंड लढाईचा इतिहास आहे असं चित्र शाळेतला इतिहास वाचणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनात तयार होतं. आणि या चित्राचा फायदा घेऊन काही मंडळी आपली राजकारणं करू पाहातात.

जी मंडळी हिंदुराष्ट्राची कल्पना मांडतात, त्याचा अभिमान बाळगण्याची भाषा करतात एवढंच नव्हे तर रामजन्मभूमी म्हणून तेथे रामाचं मंदिर व्हावं असं आग्रहानं मांडतात अशी मंडळीसुद्धा जोतिबा फुल्यांच्या स्मृतिशताब्दीच्या निमित्ताने फुल्यांचं गुणगान करायला उभी राहातील. माझा प्रश्न आहे की फुल्यांनी मुसलमान आक्रमकांबद्दल काय म्हटलं आहे हे यांना ठाऊक आहे काय आणि असल्यास मान्य आहे काय?

म. फुल्यांनी, मुसलमान आक्रमकांनी सोरटी सोमनाथाचं देऊळ फोडलं याबद्दल त्यांचं कौतुक केलं आहे आणि शेतकऱ्यांचं 'विमोचन' करण्यातला हा एक टप्पा होता असं म्हटलं आहे. इथल्या शेतकऱ्यांना स्थानिक राजांनी, ब्राह्मणांनी, भटशाहीने लुटलेलं असतांना 'महम्मदाच्या जहामर्द शिष्यां' नी येऊन त्यांचं 'विमोचन' केलं, त्यांची मुक्तता केली अशी भूमिका जोतिबांनी स्पष्टपणे मांडली होती.

म. जोतिबा फुल्यांनी स्वातंत्र्य चळवळीविषयीही असेच मुद्दे मांडले होते. वासुदेव बळवंत फडके नावाचा क्रांतीकारक जोतिबांच्या काळात इंग्रजांविरूद्ध बंड करून उठला होता. त्याच्याबरोबर दुसरेही काही क्रांतीकारक हाती पिस्तुले घेऊन निघाले होते. आज वासुदेव बळवंत फडके आणि बाकीची ही सगळी क्रांतीकारक मंडळी, हातामध्ये बाँब घेऊन निघालेली, बंदुका घेऊन निघालेली हे देशाचे धीरोदात्त नायक बनले आहेत. जोतिबा फुल्यांनी मात्र वासुदेव बळवंत फडक्यांचा उल्लेख पुन्हा एकदा ब्राह्मणशाही आणि पेशवाई स्थापन करण्याकरिता प्रयत्न करणाऱ्या पुण्यातील ब्राह्मणांपैकी एक असा केला आहे.

जोपर्यंत इंग्रज आहे तोपर्यंत इथल्या कुणब्यांना ज्ञान मिळण्याची शक्यता आहे, विद्या मिळविण्याची शक्यता आहे, भटशाहीच्या जाचातनं सुटण्याची शक्यता आहे. ज्यांनी शूद्रांना हजारो वर्षे गुलामगिरीत ठेवलं ती माणसं कुणब्यांची या गुलामगिरीतून सुटका होणार किंवा नाही, अस्पृशांना माणसासारखं वागवलं जाणार की नाही याविषयी काही न बोलता ज्या इंग्रजांनी विद्येचे द्वार सर्वांना खुले करून दिले त्या इंग्रजांविरूद्ध लोकांच्या मनात अप्रीती निर्माण करीत आहे असा आरोप जोतिबांनी या क्रांतिकारकांवर केला.

जोतिबा फुल्यांच्या नावाचा वारसा सांगणारी ही मंडळी त्यांना महामानव

म्हणतील, महात्मा म्हणतील, शेतकऱ्यांचे कैवारी म्हणतील पण जोतिबांनी मांडलेल्या मूळ मुद्द्याला आणि विचाराला अजिबात हात लावीत नाहीत. मला सांगतांना अभिमान वाटतो की शेतकरी संघटना ही खऱ्या अर्थानं जोतिबा फुल्यांची वारसदार आहे याचं कारण, आम्ही मानतो की वासुदेव बळवंत फडक्यांचं बंड हे पेशवाईकरताच होतं; संपूर्ण हिंदुस्थानातल्या लोकांच्या स्वातंत्र्याकरिता नव्हतं.

शिवाजीचा इतिहास मांडतांना मी असे म्हटलयं की रामदेवरायाच्या देवगिरीवरील मुसलमानांचं आक्रमण त्या काळच्या शेतकऱ्यांना आनंददायक वाटलं असलं पाहिजे. दरवर्षी या हिंदू राजाच्या फौजा यायच्या आणि शेतकऱ्यांनी पिकवलेलं धान्य लूटून न्यायच्या. मोठे रंजीस आले होते सगळे शेतकरी. बाहेरून आलेला कोणीतरी या रामदेवरायाचा भंडाफोड करतो आहे म्हटल्यानंतर त्यांना अक्षरशः आनंद वाटला असेल. म्हणून तर मुसलमानी फौजा दिल्लीहून निघाल्या आणि थेट देवगिरीपर्यंत येऊन पोहोचल्या. १२९५ ते १३१८ या २३ वर्षांच्या काळात पाच वेळा मुसलमानी फौजा देवगिरीपर्यंत आल्या. जर का लढा हिंदु आणि मुसलमान यांच्यामधील असता तर कोठेतरी या काळामध्ये शेतकऱ्यांनी एकत्र होऊन अल्लाउद्दिनच्या किंवा त्याच्या भाच्याच्या फौजा थांबविण्याचा प्रयत्न केला असता. एकदासुद्धा असा प्रयत्न झाला नाही एवढंच नव्हे तर रामदेवरायाची फौज अल्लाउद्दिनाच्या फौजेपेक्षा संख्येने कमी पडली म्हणून रामदेवरायाचा पराभव झाला असे इतिहासकार लिहितात. रजपुतांच्या इतिहासामध्येसुद्धा अनेक वेळा असंच म्हटलं जातं.

परराज्यातून आलेलं सैन्य, हजारो मैलांवरून आलेलं सैन्य संख्येनं इतकं प्रचंड असायचं की स्थानिक सैन्य त्याची बरोबरीसुद्धा करू शकत नसे; प्रजाही त्यांच्या मदतीला येत नसे. स्थानिक राज्यकर्ते, मग ते चितौडच्या किल्ल्यातले असोत का देवगिरीच्या, आसपासचा एकही शेतकरी त्यांच्या मदतीला येत नसे कारण ते त्या शेतकऱ्यांची लूट करणारेच राजे होते. याचा अर्थ एकच, अल्लाउद्दिन जेव्हा आला तेव्हा लढाई हिंदु-मुसलमानांची नाही झाली; एक लुटारू विरूद्ध दुसरा लुटारू अशी ही लढाई झाली. चौदाव्या शतकाच्या सुरूवातीला मालोजीनं स्वराज्याची पहिली लढाई लढण्याची तयारी सुरू केली. या दरम्यानच्या काळात म्हणजे अडीचतीनशे वर्षे मुसलमान राज्याला महाराष्ट्रात कोठेही विरोध झाला असे दिसत नाही उलट ते राज्य गावोगावी पसरलं, महसूल व्यवस्था तयार झाली, शेतीच्या मोजमापाची व्यवस्था झाली, कर्ज मिळेल अशी व्यवस्था झाली असे इतिहासकार सांगतात. तेव्हा इतिहासात ज्या काही लढाया झाल्या त्या धर्माधर्मातल्या लढाया नव्हत्या. शेतकऱ्यांच्या शोषणाचा इतिहास हाच मानवाचा इतिहास आहे ही भूमिका जोतिबांनी मांडली, हीच भूमिका शेतकरी संघटना मांडते.

ज्या दिवशी शेतीतच एका दाण्यातून शंभर दाणे तयार होण्याचा चमत्कार होतो असं दिसलं त्या दिवसापासून शेतीमध्ये तयार झालेली बचत लुटून कशी न्यायची याचाच इतिहास तयार झाला अशी आमची मांडणी आहे. लूट करणारी माणसं कधी एकाकाळी तीरकमठा घेऊन आली असतील, कधी जिरेटोप घालून आली असतील तर कधी मुगुट, कधी हॅट घालून आली असतील, तर कधी गांधी टोपी किंवा काही वेळा टोपीसुद्धा न घालता येतील, पण शेतकऱ्याला लुटण्याकरिताच येतील हा सबंध मानवजातीच्या इतिहासाचा अर्थ आहे. ते कधी चोरडाकू असतील, दरोडेखोर असतील, कधी राजेरजवाडे तर कधी सरदारदरकदार, कधी हातामध्ये तराजू घेतलेला काळा व्यापारी असेल तर कधी गोरा व्यापारी, कधी तो गोरा इंग्रज असेल तर कधी काळा इंग्रज. पण सर्वजण येतील ते शेतकऱ्याची लूट करायला हाच सर्व मानव जातीचा. इतिहास आहे हे जितक्या ठामपणाने जोतिबा फुल्यांनी सांगितले तितक्याच ठामपणाने आज शेतकरी संघटनाही मांडते आहे.

आणखी एक साम्य जोतिबा आणि शेतकरी संघटनेच्या विचारांत आहे. शेतीतल्या गरीबीचा प्रश्न निघाला की आमच्या डाव्या मित्रांच्या तोंडी लगेच छोटा शेतकरी, मोठा शेतकरी; पंचवीस एकरांचा शेतकरी, पाच एकराचा शेतकरी; शेतमालक शेतकरी आणि भूमिहीन असे शब्द येतात. दारिद्र्याविरूद्धची लढाई म्हणजे या गटांतील लढा आहे अशी मांडणी ते करू लागतात. पण 'शेतकऱ्याचा असूड' असे मध्ये जोतिबा फुल्यांनी शंभर वर्षापूर्वी ज्याच्या घरी आठ बैलांचा बारदाना आहे अशा शेतकऱ्याच्या हलाखीचं आणि गरिबीचं वर्णन केलं आहे ते मुळातूनच वाचलं पाहिजे. शेतकऱ्याकडे जमीन किती आहे, बैल किती आहेत यावरून तो किती मोठा किती लहान ठरत नाही. सगळेच तत्कालिन 'लुटारू' कडून लुटले जातात. फुल्यांनी हे शंभर वर्षांपूर्वी मांडलं, आज शेतकरी संघटनाही तेच मांडते आहे.

म. फुल्यांचा विचार आणि शेतकरी संघटनेचा विचार यांत एक फरक आहे. शेतकऱ्यांची ही स्थिती 'अविद्येने' झाली असं जोतिबांनी म्हटले. शेतकऱ्याला विद्या असती तर असा प्रश्न निघाला नसता असा त्यांचा विश्वास होता हे त्यांनी लिहिलेल्या एका संवादातून दिसते. प्रश्न होता, कारकून हे भट कारकून नसते आणि त्यांच्या ऐवजी शेतकऱ्याची पोरं असती तर आपल्यावर इतका अन्याय झाल असता का? त्यावर जोतिबांचं उत्तर आहे की कधीच झाला नसता कारण आपल्यामध्ये रोटीबेटीचे व्यवहार व्हायचे आहेत, आपल्या एकमेकांबरोबर जगायचे आहे. या बाबतीत जोतिबा शंभर टक्के खोटे ठरले.

शेतकऱ्यांची मुलं भटकारकुनांसारखी कारकून झाली, महसूल कचेरीत गेली एवढंच नाही तर अगदी मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावरील गालिचावर चालत गेली. तिथं गेल्यावर एवढंच दाखवलं की पूर्वीचा तो भटकारकून परवडला पण आताचा हा भूविकास बँकेतला कारकून नको असं म्हणायची वेळ आता शेतकऱ्यांवर आली आहे. देशातील दारिद्र्याचा प्रश्न हा वर्गसंघर्षाचा प्रश्न आहे अशी भूमिका डावी मंडळी मांडतात. जोतिबांना वर्ग ही कल्पना माहिती नव्हती असे नाही. त्यांच्या लिखाणातून हे स्पष्ट दिसतं की आर्थिक हितसंबंध सारखे असलेल्या लोकांचा समुदाय या अर्थानं ते वर्ग ही संकल्पना जाणत होते.

पण शोषणाचं साधन वर्ग नसून जातीसारखी व्यवस्था असते, धर्मासारखी व्यवस्था असते, गावासारखी व्यवस्था असे अशी स्पष्ट मांडणी त्यांनी केली आहे. याही बाबतीत शेतकरी संघटना जोतिबा फुल्यांची वारस आहे.

हिंदु धर्मव्यवस्थेच्या आधाराने येथील राजेरजवाड्यांनी वर्षानुवर्षे शेतकऱ्यांची लूट केली, मुस्लिम आक्रमकांनी येथील सामान्य जनतेची या लुटीपासून मुक्तता केली अशी मांडणी जोतिबा फुल्यांनी केली हे त्यांच्या लिखाणातून स्पष्ट होते. काही संदर्भ पाहू या. (पुढील सर्व संदर्भ ''महात्मा फुले समग्र वाङ्मय, सं. धनंजय कीर व स. गं. मालशे, प्र. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, तृतियावृत्ती, मे १९८८'' मधील आहेत)

'शेतकऱ्याचा असूड या पुस्तकात ते लिहितात.

''....हजरत महमद पैगंबराचे जहामर्द शिष्य, आर्य भटांचे कृत्रिमि धर्मासहित सोरटी सोमनाथासारख्या मूर्तींचा तरवारीचे प्रहारांनी विध्वंस करून, शूद्र शेतकऱ्यांस आर्यांचे ब्रह्मकपाटातून मुक्त करूं लागल्या मुळें,....'' पृ. २१५) याचा अर्थ जोतिबांच्या भूमिकेत इतिहासाचा अर्थ हिंदू विरूद्ध मुसलमान लढाई असा नव्हता.

जी माणसं हिंदुमुसलमानांमध्ये आजच्याप्रमाणे भांडणं लावायचा प्रयत्न करीत होती त्यांच्याविषयी जोतिबा म्हणतात,

''...हें पाहून कित्येक धूर्त भटब्राह्मण खुळ्या हिंदुधर्मास पाठीशीं घालून नाना प्रकारचे नवे समज उपस्थित करून त्यांमध्यें अपरोक्ष रीतीने महमदी व खिस्ति धर्मांच्या नालस्त्या करून त्यांविषयी शेतकऱ्यांचीं मनें भ्रष्ट करीत आहेत.''

(शेतकऱ्याचा असूड, पृ. २१६)

जोतिबा फुले १८८३ साली जे सांगत होते तेच आज १९८९ साली सांगण्याची वेळ आली आहे.

''....तथापि अलीकडे कांही शतकांपूर्वी, (शेतकऱ्यांची जी हीनदीन अवस्था होती ती पाहून) महमदी सरकारास त्यांची दया येऊन शूद्रादि अतिशूद्रांस जबरीनें मुसलमान करून त्यांस आर्यधर्माच्या पेंचांतून मुक्त करून त्यांस आपल्या बरोबरीचे मुसलमान करून सुखी केले.''

(शेतकऱ्याचा असूड, पृ. २३९, कंस लेखकाचा)

''हजरत महमद पैगंबराच्या निस्पृह शिष्यमंडळींचें जेव्हा या देशात पाऊल पडलें, तेव्हां ते आपल्या पवित्र एकेश्वरी धर्माच्या सामर्थ्यानें आर्यभटांच्या मतलबी धर्माचा फट्टा उडवूं लागलें.'' (शेतकऱ्याचा असूड, पृ. २७१)

''...आर्यभटांनी आपल्या भाकड भारतरामायणांतील शेतकऱ्यांस गोष्टी सांगून, त्यांना उलटे मुसलमान लोकांबरोबर लढण्याचे नादीं लाविले;...

(शेतकऱ्याचा असूड, पृ. २७२)

जोतिबांनी शेतकऱ्यांना सावधगिरीचा इशारा दिला की हा तुमच्यामध्ये भांडणे लावण्याचा प्रयत्न आहे.

मुसलमान या देशात आले याबद्दल आपली भावना व्यक्त करतांना म. फुले म्हणतात -

''आपल्या सर्वांच्या दयाघन निर्माणकर्त्यानें कृपाळू होऊन धूर्त आर्य भट्टांच्या दास्यत्वापासून पंगू शूद्रादि अतिशूद्रांस मुक्त करण्याकरितां, आपणा सर्वांचा निर्माणकर्ता एक मानून, जातिभेदाचा समूळ नाश करणारे मुसलमान लोकांस या देशांत पाठविले;....''

(सार्वजनिक सत्य धर्मपुस्तक, पृ. ३८५)

मुसलमानांना परमेश्वराने पाठविले असे जोतिबा म्हणतात एवढेच नव्हे तर 'इंग्रजी राज्य हे परमेश्वराचं या देशास मिळालेलं अतर्क्य वरदान आहे' असं ज्याप्रमाणे ना. गोखले म्हणत असत तसंच 'मुसलमान आले म्हणून जातीयवादाला काहीतरी आळा बसला' असं त्यांनी स्पष्ट म्हटलं आहे.

''कृत्रिमी आर्य भूदेव नटांच्या अपमतलबी बनावट धर्माच्या पाशांत सांपडलेल्या बहुतेक आज्ञानी मूर्तीपूजकांचें कल्याण होण्यासाठीं कित्येक धार्मीक जाहामर्द मुसलमानांनी आपल्या हातावर शिरें घेऊन तलवारीच्या जोरानें त्यांनीं आपल्यासारख्या त्यांच्या सुंता करून त्यांस 'बिसमिल्ला हिर रहिमान् निर्रहिम'' असा महापवित्र कलमा पढवितात व त्यांस आपल्या सर्वांच्या सरळ सत्य धर्ममार्गावर नेतात. कारण महंमदी लोकांच्या पवित्र कुराणांत एकदंर सर्व प्राणीमात्रांचा निर्माणकर्ता खास एक आहे आणि याच कारणामुळे त्यास खुदा म्हणतात व त्या खुदाने निर्माण केलेल्या मानवांस एकमेक भावंडांप्रमाणे मानितात. त्याचप्रमाणें एकंदर सर्व मानवासं त्यांचें पवित्र कुराण वाचून पाहाण्याची व त्याचप्रमाणे आचरण करण्याची मोकळीक आहे, तसेंच ते सर्वांस आपल्या बरोबरीचे हक्क देऊन त्याजबरोबर रोटी व बेटी व्यवहार सुरू करण्याची मोकळीक देतात, आणि अखेरीस त्या सर्वांस आपल्या सर्वांच्या खुद्द निर्मीकाचे आभार मानण्याकरितां महिझीतींत आपल्याबरोबर घेऊन बसतात.''

(सार्वजनिक सत्य धर्मपुस्तक : पृ. ३९९)

आमचा धर्म हिंदु म्हणायचे, पण देवळात जाण्याचा आम्हाला अधिकार नाही, जो परमेश्वर म्हणायचा त्याचे रूप पाहाण्याचा अधिकार नाही, परमेश्वराचे जे पुस्तक म्हणायचे ते वाचायचा आम्हाला अधिकार नाही, मग आम्हाला हिंदु म्हणायचं तरी कसं असा खडा सवाल जोतिबांनी केला आहे.

निर्मीकाने निर्मिलेल्या सर्व प्राणीमात्रांना स्वतंत्रपणे जगता यावे अशी त्याची न्यायबुद्धी होती असे जोतिबा मानत. पण त्यातील सर्वोत्तम अशा

''...मानवांपैकीं शूद्रादि अतिशूद्रांचे पूर्वी तरवारीच्या आणि सांप्रत ठकबाजीच्या जोराने धनी आर्य मानव बनले आहेत. यास्तव सर्वन्यायी आपल्या सर्वांच्या निर्मीकाने शूद्रादि अतिशूद्रांबद्दल धूर्त धूर्त आर्यभटांस प्रायश्चित्त देऊन त्यांस शुद्धीवर आणण्याकरितां पूर्वी मुसलमानांस व हल्ली ख्रिस्त्यांस आर्यांचे धनी केले आहेत, हे पक्के समज.''

(सार्वजनिक सत्य धर्मपुस्तक : पृ. ४२०)

जोतिबांनी 'तृतीय रत्न' नावाचे नाटक लिहून त्यात ब्राह्मण देवकार्याच्या निमित्ताने कुणब्यांना कसे लुबाडत असत त्यांचं सविस्तर वर्णन केलं आहे. या नाटकात पाद्री आणि कुणबी शेतकऱ्याच्या संवादात (पृष्ठे ५४५-५४६) शेतकऱ्याच्या मनात 'दृष्टिअगोचर' परमेश्वराची भक्ती रुजून तो

मारुतीची मूर्ती फोडावयास उद्युक्त होतो. हे शेजारी संवाद ऐकत असलेल्या मुसलमानाने पाहाताच तो पुढे येऊन विचारतो की पूर्वी आमच्या बादशहांनी या हिंदूंची देवळे पाडली आणि मूर्ती फोडल्या म्हणून हे अजूनही आमचा रागराग करतात, तो का? त्यावर त्या पाऱ्याने उत्तर दिले,

''टुमकु माआलुम नही मेरे साहाब टुमारे बादशाआवाने इन्होंके बुंतोंकू फोड् डाले, सो अच्छा किया यह सच है, लेकीन उन्होने हमारे मूजब तकरीर करकरके उन्होके हातोसे फोडा नही'' (तृतीय रत्न : पृ. ५४६)

शेतीवर एका दाण्यापासून शंभर दाणे बनण्याचा चमत्कार जेव्हा पासून दिसून आला तेव्हापासून शेतकऱ्याची लूट चालू झाली. ही लूट ठेवायची कुठे? शेतकऱ्याकडून जमा झालेली लूट ठेवण्याची सगळ्यात सुरक्षित जागा म्हणजे देवळे. बाहेरून हल्ला करून कुणी माणसं आली तरी ती घरातील धनधान्य लुटून न्यायची; देवाच्या भीतीने देवळांना ते हात लावीत नसत. याच एका कारणाने देवळांमध्ये धनसंपत्ती साठून राहिली म्हटल्यावर चोर दरवडेखोर किती काळ स्वस्थ बसून राहातील? त्यांना दिसत होतं की देवळातून संपत्ती, सोनेनाणे साठून राहिले आहे पण देवाची भीती वाटून हिम्मत होत नव्हती. जर का कुणी असा धर्म काढला की ज्यामध्ये देवळं फोडायची आणि लुटायची परवानगी आहे तर चोरलुटारूंना ओपन जनरल लायसन्स मिळणार होतं. आणि मुसलमान धर्माने त्यांना असलं लायसन्स दिलं. म्हणून ही देवळं बांधणारे हे शेतकऱ्यांना लुटणारे आणि देवळ तोडणारे हे शेतकऱ्यांना लुटणाऱ्यांना लुटणारे. या सगळ्यांचा इतिहास हा मुळात शेतकऱ्यांशी सबंधित नसलेला, लुटारूंचा इतिहास आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना कोणाचीही बाजू घेऊन अभिमान बाळगण्याचे कारण नाही.

पानिपतला १७६१ साली महाराष्ट्रातून सदाशिवभाऊ चाल करून गेले. तेथे अहमदशाह अब्दालीने त्यांचा पराभव केला. त्यावेळीही तेथील हिंदू शेतकरी काही हिंदुमुसलमानांची लढाई चालली आहे म्हणून सदाशिवभाऊंच्या मदतीला गेला नाही, शेतात उभं राहून लढाई बघत राहिला. कारण त्यांना माहित होतं की जिंको कोणी हरो कोणी जो जिंकेल तो आसपासच्या शेतकऱ्यांची लूटच करणार आहे. आज हरयानात मी शेतकरी संघटनेचा विचार घेऊन शेतकऱ्यांची चळवळ, शेतकऱ्यांच्या लुटीविरूद्धची चळवळ उभी करण्यासाठी गेलो तर तिथले सर्व धर्मांचे शेतकरी-हिंदु, शीख, मुसलमान - मी कोणत्या धर्माचा असेन असा विचार मनात न आणता माझ्याबरोबर यायला तयार असतात.

जोतिबा फुल्यांनी इतिहासासंदर्भात केलेली मांडणी आणि शेतकरी संघटनेची मांडणी यात निश्चित साधर्म्य आहे. पण आज दुर्दैवाने, पुन्हा एकदा इतिहासाचा खोटा अर्थ सांगणारे, देवळं फोडली असं सांगून शेतकऱ्यांच्या मनात किल्मिष तयार करणारे एका धर्माच्या माणसांच्या विरुद्ध तलवारी किंवा सुरे घेऊन उभं राहिलं पाहिजे असं म्हणत पुन्हा एकदां फिरू लागली आहेत.

देवळांची फोडाफोडी अनेक ठिकाणी झाली. धर्मानंद कोसंबींनी महाराष्ट्रातील सर्व देवळाचा फार बारकाईनं अभ्यास केला आहे. ते म्हणतात की महाराष्ट्रात भवानीमाता, खंडोबा अशी जी काही आद्य दैवतं आहेत ती मुळामध्ये आर्य दैवतं नाहीतच, स्थानिक लोकांची दैवतं आहेत. याचा अर्थ ती आर्यांनी बाटवली आहेत. खंडोबाला शंकराचा आणि भवानीमातेला पार्वतीचा अवतार ठरवून टाकलं. म्हणजे मुळातली ही स्थानिक दैवतं आर्यांनी बाटवली म्हणून ती शुद्ध करून घेतली पाहिजेत असं आज कुणी म्हणायला जाईल का? इतिहासात जे घडून गेलं त्याच्याकरिता आज डोकेफोड आणि रक्तपात करण्याची काही आवश्यकता नाही.

हिंदुस्थानांत नाहीत इतकी मोठी हिंदु देवळं कंबोडिया, इंडोनेशिया, मलेशिया, आईसलण्ड वगैरे देशांत आहेत. तिथेही देवळं फोडणाऱ्या, देवांच्या मूर्ती बाटवणाऱ्या लढाया ब्राह्मण आणि बौद्धांमध्ये वारंवार झालेल्या आहेत. शंकराचा बुद्ध करणे आणि बुद्धाचा शंकर. कपाळावरील तिसरा डोळा काढणे किंवा असलेला बुजवणे या प्रकाराने जवळजवळ सर्व मूर्तींच्या कपाळावर टेंगूळ आल्यासारखी खूण दिसते. पण म्हणून काही, शेकडो वर्षांपूर्वी झालेल्या लढायांची आठवण ठेऊन आता पुन्हा भांडत बसून चालणार आहे?

सगळ्या इतिहासाकडे आपण खऱ्या अर्थाने पाहाणार आहोत की नाही? का गावातल्या पाटलाच्या आणि सरपंचाच्या दृष्टीतून पाहाणार? पाटलाच्या पणजोबांनी किंवा खापरपणजोबांनी सरपंचाच्या पणजोबांची किंवा खापरपणजोबांची काही खोडी काढली असेल किंवा लग्नातल्या देण्याघेण्यावरून त्यांचं भांडण झालं असेल म्हणून आजच्या नातवंडांनी यासाठी एकमेकांना जबाबदार धरून भांडत राहाण्यात काय शहाणपणा आहे?

झाला हा इतिहास एकूणच लुटालुटीचा झाला. जो काही पुढचा इतिहास घडवायचा आहे, भविष्यकाळ घडवायचा आहे तो तरी उज्ज्वल करू या म्हणून सर्व माणसं एकमेकांतलं वैर विसरून काम करायला लागली तर काही चांगलं निष्पन्न होईल. आज महाराष्ट्रात जे काही प्रश्न निर्माण झाले आहेत, जे काही विद्वेषाचे वातावरण तयार झाले आहे या परिस्थितीत म. जोतिबा फुले यांच्या स्मृतिशताब्दीच्या निमित्ताने त्यांच्या विचारातील इतिहासाचं सम्यक्, समर्पक दर्शन देणारी दृष्टी घेऊन इतिहासाचा अर्थ समजून घेतला तर काही आशा आहे. गेल्या शंभर वर्षांत जोतिबांना न्याय देणारा कुणी भेटला नाही. पण त्यांचा विचार मनात बाणवून जर का शेतकऱ्यानं आपला आसूड बाहेर काढला, एकजुटीनं हातात रूमणं घेऊन मनामनांमध्ये विद्वेष तयार करणाऱ्या विघटनवाद्यांना त्यानं दूर ठेवलं तरच या स्मृतिशताब्दीच्या वर्षी तरी जोतिबांना न्याय मिळेल.

● ● ●

# मी अर्थमंत्री असतो तर –

## माझे शेतीविषयक धोरण असे राहील

**श्री. दत्तात्रय लहानू सादडे,**
**क्राम्प्टन ग्रीव्हज् लि. क. अबड, नाशिक**

१. शेतीवरील संपूर्ण बंधने काढून शेतकऱ्याला खते, बीबियाणे कीटकनाशके, औजारे इत्यादि शेतीउपयोगी वस्तूंवरील संपूर्ण कर माफ केला असता. सुलभ दरात पाणीपुरवठा करण्याची मोहीम तातडीने आखली असती आणि त्यावर कडक नियंत्रणे ठेवली असती.

२. दरवर्षी तात्पुरती पाण्याची व्यवस्था करण्यावर कोट्यावधी रुपये खर्ची टाकण्याऐवजी पिण्याच्या पाण्याची व शेतीच्या पाण्याची कायम स्वरूपी योजना आखीन.

३. दुष्काळ किंवा अतिपावसाने शेतकऱ्याचे नुकसान झाल्यास त्याची रीतसर चौकशी करून, पीकविमा नसला तरी त्याला अपेक्षित उत्पन्नाच्या तीनचतुर्थांश नुकसानभरपाई ताबडतोब देण्याची व्यवस्था करीन.

४. संपूर्ण शेतीला पाणीपुरवठा करण्याची योजना आखून पाच वर्षांत पूर्ण करीन.

५. शेतीमालावर प्रक्रिया करण्याचे छोटे छोटे कारखाने काढण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहन देईन.

६. पाणी, खते, औषधे रास्त दरात मिळाल्यानंतर शेतकरी अमाप पीक काढील. त्याला बाजारपेठ मिळाली नाही तर तो इतका कोलमडेल की त्याला पारावार राहाणार नाही. त्यासाठी मी शेतीमालाच्या निर्यातीची व्यवस्था करीन. निर्यातीसाठी परवाना काढण्याची गरज भासणार नाही. शेतीतला जास्तीत जास्त माल परदेशात पाठवून देशाला परकीय चलन मिळविण्याची व्यवस्था करीन.

७. साखर कारखाने हे सम्राटांचे किल्ले झाले आहेत. त्यांत अत्यंत कृतीशील असे बदल घडवून आणीन.

८. गरीबी हटविण्याच्या योजनांवर आज खर्च होणरा पैसा कायम स्वरूपी योजनांवर खर्ची केला जाईल.

९. राष्ट्रविकासाच्या नावे जी भरमसाठ उधळपट्टी केली जाते त्यावर कडक बंधने आणून तो योग्य योजनांकडे वळवीन.

१०. शेतकऱ्याला कर्जात बुडविणारी, उपासमारीत ढकलणारी सर्व सरकारी धोरणे रद्द करीन.

# बिगरशेतीक्षेत्राला वेसण घालून शेतीला स्वतंत्र करीन

**श्यामसुंदर बसेर,**
मु. पो. जळगांवखुर्द, ता. जि. जळगांव

आजमितीला मी जर भारताचा अर्थमंत्री असतो. तर एका कृषीप्रधान देशाचे आर्थिक नियोजन खऱ्याअर्थाने कृषीप्रधान देशाचे करणे हे परम कर्तव्य समजून प्रामाणिक धोरणे आखली असती, कारण शेकडो वर्षापासून शेतीला लुटण्याचीच धोरणे सर्व सरकारांनी राबविलीत. स्वातंत्र्यानंतर औद्योगिक क्रान्तीच्या अभिलाषेने तर शेतीशोषण हाच मुख्य उद्देश सर्वांनी नजरेसमोर ठेवून शेतीप्रधान देशातील शंभरातल्या ऐंशी लोकांना बरबाद करून ठेवले; म्हणजे देशच दुबळा करून ठेवला व मूठभर भांडवदारांना गबर बनविले.

ही दरी भरून काढण्यासाठी काही कठोर निर्णय घेणे शिवाय पर्याय नाही हे लक्षात घेऊन आजपर्यंत ज्या वर्गाचे लांगूलचालन मर्यादेपलिकडे झाले त्या व्यापारी कारखानदार व मोठे भांडवलदार यांच्यावरील आर्थिक बंधने अधिक कडक करून त्यांच्या कडील काळा व अतिरिक्त पैसा काढून घेणें व नागरी जमिनीचे सिलींग त्याचप्रमाणे त्यांच्या इतर संपत्ती व मालमत्तेचे (कारखाने बिल्डिंगा, सोनेनाणे इ.) सुद्धा सिलींग करून अतिरीक्त मालमत्ता सरकार जमा करण्यासंबंधी खास अध्यादेश काढला असता शिवाय शहरी लोक विशेषतः डॉक्टर, वकील, प्राध्यापक, बडे आधिकारी, व्यापारी कारखानदार, सिनेमावाले यांचेवर अतिरीक्त करभार लादून, त्यांना प्रथम लगाम घातला असता.

नोकरशाहीच्या भ्रष्टाचाराविरुद्ध एक खास अभियान चालू केले असते कीं, प्रत्येक अधिकारी कामावर रुजू झाला त्यावेळची त्याची मूळची सांपत्तिक परिस्थिती व आज त्याच्या पगारावर प्रामाणिकपणे तो किती शिल्लक टाकू शकतो किंवा वाढवू शकतो याचे तक्ते बनवून त्यापेक्षा जादाची प्रापर्टी व संपत्ती जप्त करण्याची कडक कार्यवाही केली असती. अश्याच प्रकारची जंत्री व्यापारी कारखानदारांसाठीही बनवून कडक अंमलबजावणी केली असती. व्यापारी कारखानदारांना ज्या अनेकविध आर्थिक सवलती हल्ली आहेत. त्या सर्वच बंद करून टाकल्या असत्या; त्याबरोबरच रिझर्व्ह बँकेतील त्यांच्यासाठी बुडीत फंडाची असलेली विद्यमान तरतूद अजिबात बंद करून तश्या बुडीत फंडाची तरतूद फक्त शेतीक्षेत्रासाठी केली असती.

सर्वप्रकारचे राष्ट्रीय बचत सर्टीफिकेटस्, युनीटस्, कर्जरोखे, बॉंडस्, हल्लीचे सुवर्णरोखे इ. सर्व रद्दबातल ठरवून सर्व संपत्ती राष्ट्रीय कोषात सक्तीने जमा करून ५०० रुपयाच्या चलनी नोटा रद्द केल्या असत्या. कारण हे घेणारे बहुतांशी काळ्या पैशावालेच आहेत. त्यांच्या संरक्षणार्थच ह्या योजना चालू होत्या.

सदर अभियानाची योग्य अंमलबजावणी होण्यासाठी सर्व राजकीय नेते, व्यापारी व भांडवलदारांचें पासपोर्ट ताबडतोबीने बंद केले जातील व कुणालाही देश सोडून परदेशांत पळता येणार नाही किंवा संपत्तीसुद्धा बाहेर नेता येणार नाही याबाबत कडक दक्षता बाळगली जाईल.

अश्या प्रकारे वरील "ऑपरेशन कॅपीटल" मुळे जी संपत्ती गोळा होईल ती एवढी असेल की, देशापुढील आजचे सर्व यक्षप्रश्न सोडविण्यास व सुलभ होण्यास जागतिक बँकेची मुळी गरजच भासणार नाही त्यामुळें आपला नियोजित कार्यक्रम शंभरटक्के स्वातंत्र्रीत्या आपण राबवू शकू. बाहेरील कोणतेही दडपण आपल्यावर येऊ शकणार नाही.

याप्रमाणे घोडेगाडीच्या दोन घोड्यांपैकी माजलेल्या व पुढेपुढे पळणाऱ्या उन्मत्त घोड्याचे लगाम मजबूत आवरून थकलेल्या गरीब घोड्याल (शेती व्यवसाय) त्याच्या बरोबरीने चालण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करून देऊन इशारा देवून दुडकी मारण्यास प्रवृत्त करण्याचे काम पुढच्या "ऑपरेशन कृषी" या अभियानाने कसे केले जाईल ते थोडक्यात असे. "ऑपरेशन कृषी" अंतर्गत माझा पहिला प्रस्ताव असेल शेतीमालाच्या व्यापाराचे राष्ट्रीयकरण. म्हणजे भारताचा संपूर्ण शेतीमालाचा देशांतर्गत व देशाबाहेरील व्यापार (आयात-निर्यातसुद्धा) संपूर्णपणे सरकारच करील. खाजगी व्यापार बंद. यामुळेच शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने आर्थिक न्याय देता येऊ शकतो. या कार्यक्रमाअंतर्गत २५ रु. रोज याप्रमाणे शेतमजुराची मजुरी धरून शेतमालाच्या किंमती काढायच्या व उत्पादन खर्चावर आधारित किंमत शेतकऱ्यांना द्यावयाची व तो खरेदी करून साठविणें, प्रक्रिया, सुरक्षित ठेवणे व गिऱ्हाईकांपर्यंत पोहचविणें या सर्व यंत्रणेवर होणाऱ्या खर्चाचा हिशेब करून शिवाय राष्ट्रीय कार्यासाठी कांही जादा पण योग्य पैसा शिल्लक राहील असा हिशेब धरून त्याची विक्रीची किंमत ठरविणें व तो सर्व माल सरकारी दुकानातूनच देशभर एकाच भावात वर्षभर वितरीत करणें. याद्वारेच हा उद्देश सफल होवू शकतो यात मुळीच शंका नाही. यामुळे उत्पादक व गिऱ्हाईक या दोघंनाही न्याय मिळेल. व एकतर्फी महागाईची बोंब होणार नाही. सरकारी वितरण व्यवस्थेमधील आजचे दोष (भ्रष्टाचार) घालविण्यासाठी दुकानदार हे पगारी राहतील, मालाची वाहतूक थेट दुकानापर्यंत सरकारी वाहनाने व खर्चाने होईल. यामुळें अधिकारी, कर्मचारी व दुकान दार यांचेकडून कडक शिस्तीने काम घेण्यात येईल.

ऑपरेशन कृषी अंतर्गत पहिली दहा वर्ष हे 'किसान

दशक' म्हणून पाळले जाईल.

शेतीक्षेत्राला सबळ होण्यास वाव मिळावा म्हणून किसान दशकातील पहिल्या पाच वर्षात शेती व्यवसायावर कोणताही कर राहणार नाही. मात्र त्यापुढील पाच वर्षात शेतकरी वर्गाची आर्थिक प्रगती तपासून थोडेथोडे राष्ट्रीय गंगाजळीसाठी म्हणून कांही कर लादता आला तर तसा प्रयत्न केला जाईल.

किसान दशकातील पहिल्या पाच वर्षाच्या काळात शेतीला पाणी व वीज मोफत देण्यात येईल. यात हल्ली या सेवा जेथे व ज्या परिस्थितीत आहेत त्याप्रमाणेच सवलत मिळेल. म्हणजे पहिल्या ५ वर्षांत नव्याने मोफत सोयी करून मिळणार नाही.

शेतकऱ्यांच्या जुन्या (थकलेल्या) कर्जावरील सर्व व्याज माफ करण्यात येईल. व मूळ कर्जाचे पाच हप्ते करून पहिल्या पाच वर्षात ते वसूल केले जातील. तसेच अश्या शेतकऱ्यांना याच वर्षापासून नव्यानें कर्जपुरवठा चालू केला जाईल.

शेतीकर्जाचा व्याजदर देशांत सर्वत्र १२% राहील पतपुरवठा रिझर्व्ह बँकेमार्फतच होईल.

शिखर बँका, जिल्हा बँका, सोसायट्या किंवा इतर संस्थांसारखे मधले दलाल रद्द करून गाव पातळीवरची आजच्या सोसायटीच्या यंत्रणेला रिझर्व्ह बँकेच्या शाखेचे नामकरण करण्यात येईल. त्यामुळे व्याजाच्या रकमेची २ किंवा ३% रक्कम दलाली म्हणून वाटण्याची पद्धत बंद होईल. सहकार खातेच बंद केले जाईल. सर्व सहकारी संस्थांचे सरकारीकरण करून गुंडपुढाऱ्यांचा हैदोस थांबविला जाईल.

"पीकवीमा" ची अंमलबजावणी अधिक सुलभ व चोख करण्यात येईल. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याला पीकबुडीची भरपाई हमखास होईल अशी यंत्रणा असेल.

त्याचप्रमाणे शेतीसाठी इतर विम्यांचीसुद्धा सोय असेल. उदा. विहीर, घरे, मशिनरी, जनावरे, पशुपक्षी इत्यादि.

शेतीमाल खरेदी व विक्रीकेंद्र यंत्रणा गाव पातळीवर (२००० लोकसंख्येचे गांव) करण्यात येईल. यामुळे वाहतूक व साठवणीच्या खर्चात बचत व सुलभता येईल.

अन्नधान्य व फळांवर प्रक्रिया करण्याचे उद्योग ग्रामपातळीपासून (छोटे युनिटस्) चालू केले जातील.

शाळांमधून शेतीच्या शिक्षणाबरोबर अन्न धान्य व फळ संस्करणाचे शिक्षण देण्यात येईल.

रासायनिक खतांचा व कीटकनाशकांचा वापर एकदम बंद न करता शेतकऱ्यांना योग्य ते प्रशिक्षण देऊन हळूहळू कमी करण्यात येईल.

पुढील अंकी चालू...........

# कर्जमुक्ती अर्ज एकत्रितपणे मागे घेण्यास सुप्रीम कोर्टाची अनुमती

शेतकरी संघटनेच्या कर्जमुक्ती आंदोलनांत महाराष्ट्रातील सर्व जिल्हा न्यायालयात दाखल केलेले कर्जमुक्ती अर्ज (नादारीचे अर्ज) एकत्रितपणे मागे घेण्याची परवानगी मागणारा अर्ज शेतकरी संघटनेच्या वतीने श्री. शरद जोशी यांनी १९८९ च्या अखेरीला सुप्रीम कोर्टात केला होता. दि. ६ एप्रिल १९९२ रोजी या अर्जाची सुनावणी सुप्रीम कोर्टाच्या खंडपीठासमोर झाली. या खंडपीठाचे सदस्य होते न्या. ए.एम. अहमदी व न्या. एस्. मोहन. शेतकरी संघटनेच्या वतीने ॲड. विनोद बोबडे व ॲड. श्याम मुदलीयार यांनी काम पाहिले. प्रतिवादी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या वतीनेही, सुप्रीम कोर्टाने पूर्वी सूचना केल्यानुसार हिशोबपत्रके सादर करण्यात आले. दोन्ही बाजूंचे प्रतिवादी ऐकून घेतल्यावर सुप्रीम कोर्टाने हे दोन्ही अर्ज (शेतकरी संघटना व महाराष्ट्र राज्य सहकारी बँक यांचे) तोंडी आदेशाने निकाली काढले व वर्धा जिल्ह्यातील ज्या अर्जांच्या बाबतीत 'रिसिव्हर' नेमला गेला होता त्या अर्जाव्यतिरिक्त महाराष्ट्रातील सर्व अर्ज मागे घेण्याची अनुमती दिली. वर्धा जिल्ह्यातील ज्या अर्जांच्या बाबतीत रिसिव्हर नेमले गेले त्या अर्जदारांनी व्यक्तीशः वर्धा जिल्हा न्यायालयात अर्ज करून आपले अर्ज मागे घेण्याची अनुमती मागावी असेही न्यायमूर्तींनी हा निकाल देताना सांगितले. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने 'रिसिव्हर अकाऊंट' चे हिशोबपत्रक अपुरे सादर केल्याबद्दल न्यायालयाने नाराजी व्यक्त केली व बँकेने संपूर्ण महाराष्ट्रभरचे हिशोबपत्रक सादर करावे अशी सूचना दिली.

● ● ●

# राजा झाला उदार !

## केंद्रशासन गव्हाला २५ रु. बोनस देणार

केंद्र शासनाने गव्हाची आधारभूत किंमत प्रति क्विंटल रु. २५०/- जाहीर केली आहे. ही किंमत फारच कमी असल्याने व शासन अमेरिकेकडून प्रति क्विंटल ४५० रुपये दराने गहू आयात करतांना दिसत असल्याने पंजाब, हरयाणा व उत्तर प्रदेशच्या शेतकऱ्यांनी गहू बाजारात न आणण्याचे ठरविले आहे. परिणामी, सरकारी खरेदी ठप्प झाली आहे. राष्ट्रीय अन्न महामंडळाची कोठारे रिकामी होऊ लागली आहेत. शेतकऱ्यांना डावलून परदेशातून हवा तितका गहू आणण्याची क्षमता शासनाच्या परकीय चलनाच्या तिजोरीत नाही.

या पार्श्वभूमीवर ७ एप्रिल १९९२ रोजी विरोधीच नव्हे तर इंदिरा काँग्रेसच्या खासदारांनीही शेतकऱ्यांना किफायतशीर भाव न देण्याबाबत शासनाला धारेवर धरले. शेवटी या चर्चेत हस्तक्षेप करून कृषिराज्यमंत्री श्री. तरूण गोगई यांनी जे शेतकरी अन्न महामंडळाला गहू विकतील त्यांना केंद्र शासन आधारभूत किंमतीखेरीज प्रति क्विंटल २५ रुपये बोनस जाहिर केला आहे. या मधाच्या बोटाने शेतकरी फसतीलच अशी खात्री नसल्याने राज्यशासनाने आणखी ५० रुपये बोनस प्रति क्विंटल द्यावा अशी सूचना दिल्याची कुणकूण आहे.

## ~~पं. स. चे उपसभापतीपद~~ शेतकरी महिला आघाडीकडे

अमरावती तालुका पंचायत समितीच्या उपसभापतीपदी शेतकरी महिला आघाडीच्या सौ. कोकिळाबाई देवीदासराव काळमेघ ९ विरूद्ध ६ मतांनी प्रतिस्पर्धी इंदिरा काँग्रेसच्या महिला उमेदवाराचा पराभव करून निवडून आल्या. सौ. कोकिळाबाई अमरावती तालुक्यातील शिराळा पंचायत समिती मतदारसंघातून निवडून आल्या आहेत.

(प्रेषक : श्री. श्रीकांत पाटील, पुजदा)

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 21st April, 1992

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
April 21, 1992

To

**PNCW 281**
Licence to post without prepayment
**No. 87**

## शेतकरी हुतात्मादिनी
# दिल्ली बोट क्लबवर धान्य व कापूस यांची होळी

किसान समन्वय समितीच्या आवाहनानुसार ६ एप्रिल १९९२ रोजी पंजाब, हरियाना, गुजरात, महाराष्ट्र इत्यादि राज्यातून आलेल्या हजारो शेतकऱ्यांनी दिल्ली येथील बोट क्लबवर गव्हाची होळी केली. देशातील शेतकऱ्याला त्याच्या उत्पादनाची किंमत कमी देणे, ही किंमत खालच्या पातळीवर राखण्यासाठी परदेशातून दुपटीच्या भावानेसुद्धा शेतीमालाची आयात करणे या शेतकरीविरोधी शासकीय धोरणाचा निषेध करण्यासाठी किसान समन्वय समितीने या आंदोलनाचे आयोजन केले होते. या आंदोलनात महिलाही मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

शेतकऱ्यांनी आपल्या सोबत आणलेल्या गव्हाची आणि कापसाची कार्यक्रमासाठी उभारलेल्या भव्य व्यासपीठासमोर रास केली आणि शेतकरी नेत्यांनी या राशीला अग्नी देऊन शासनावरील आपला राग व्यक्त केला.

राम नाम सत है, यह सरकार का अंत है ।

राम नाम सत है, यह मनमोहन सिंग का अंत है ।

राम नाम सत है, यह नरसिंह राव सरकार का अंत है ।

या अंत्यविधी मंत्रांच्या सामूहिक घोषात धान्य – कापसाचा ढीग जळत होता आणि ज्वाळा व धूर आकाशात झेपावत होता. इकडे, मंचावरून विविध राज्यांतून आलेले नेते शासनाच्या शेतकरीविरोधी धोरणावर कडक टीका करीत होते.

किसान समन्वय समितीचे अध्यक्ष श्री. विजय जावंधिया यांनी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणात शेतीमालाचे देशांतर्गत भाव व आयात मालाचे भाव यांच्यांतील प्रचंड तफावत पुढे मांडून शासनाच्या शेतकरीविरोधी धोरणाची चिरफाड केली. बाजारात रेल्वे तिकिटापासून लोखंड, खते, औषधे इत्यादी सगळ्याच वस्तूंचे भाव वाढत असतांना शेतकऱ्यांना मात्र त्यांच्या मालाला रास्त भाव मिळू नये याबद्दलचा तीव्र संताप त्यांनी आपल्या भाषणात व्यक्त केला. देशभरच्या शेतकऱ्यांनी ‘शेतकरी तितुका एक एक’ असे म्हणून संघटितपणे आवाज उठवला तरच सरकारचे डोके ठिकाणावर येईल असे त्यांनी म्हटले.

या सभेत खा. भूपेंद्रसिंग मान (पंजाब), श्री. प्रेमसिंह दहिया (हरियाणा), श्री. बिपीनभाई देसाई (गुजरात), बलदेवसिंह, चंदूसिंह माजरा (पंजाब), चौ. चंदासिंह (हरियाणा), श्री. किशोर माथनकर, सौ. सुमनताई अग्रवाल (महाराष्ट्र), स्वामी अग्निवेश (दिल्ली), श्री. कमलेशसिंग (म.प्र.), प्रा. नारायण सिंह (उ.प्र.), श्री. हेमंतकुमार (कर्नाटक) आदी मान्यवर नेत्यांनी भाषणे करून सरकारवर घणाघाती टीका केली, आणि सरकारने आपले शेतकरीविरोधी धोरण बदलण्याचा विचार केला नाही तर लढा अधिक गतीमान करण्याचा इशारा दिला.

या आंदोलनासाठी महाराष्ट्रातून सर्वश्री माथनकर, विजय जावंधिया, आ. चटप, आ. बोंडे, ललित बहाळे, मुरलीधर डहाणे, नितीन देशमुख, सौ. सुमनताई अग्रवाल, सौ. संध्या इंगाले, सौ. स्मिता गुरव यांच्यासह हजाराहून अधिक शेतकरी दिल्लीत हजर झाले होते. या सर्वांच्या राहण्याजेवण्याची व्यवस्था पंजाब भारती किसान यूनियनच्या वतीने गुरूद्वारा बंगलासाहब येथे केली होती.

बोट क्लबवरील सभेनंतर लगेच किसान समन्वय समितीचे एक शिष्ठमंडळ अमेरिकन दूतावासावर जाऊन अमेरिकन शासनाला त्यांनी एक निवेदन दिले. ‘भारत सरकार अमेरिकेतून गहू आयात करून देशातील शेतकऱ्यांनी उत्पादन केलेले गव्हाला कमी भाव देण्याचा डाव खेळत आहे. अमेरिका हे मानवतावादी राष्ट्र आहे. तरी अमेरिकेने भारतामध्ये धान्य पाठवून भारताच्या शासनाला शेतकऱ्यांना लुटण्यात मदत करू नये.’ अशी विनंती या निवेदनात केली आहे. या शिष्टमंडळाचे नेतृत्व खा. भूपेंद्रसिंह मान यांनी केले.

दुसऱ्या दिवशी किसान समन्वय समितीने शासनाच्या शेतकरीविरोधी धोरणाचे सविस्तर विश्लेषण करून शेतकऱ्यांनी मनातील असंतोषाची जाणीव देणारे एक पत्र कृषिमंत्री श्री. बलराम जाखर यांना सादर केले व शासनाने आपली शेतकरी विरोधी धोरणे सोडून द्यावीत असे आवाहन केले.

(श्री. ब. ल. तामस्कर यांनी पाठविलेल्या वृत्तांतावरून संकलित)

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक – मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ – चाकण प्रिंटिंग प्रेस, चाकण**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
फोन : द्वारा ५०६८२

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
**११८७/६६ शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.**